परिविक्षा कालावधी समाप्त करणेबाबत...
डॉ. सुशिल सुरेश चव्हाण,
वैद्यकीय अधिक्षक, वर्ग-१.
क्षय आरोग्य धाम, बुलढाणा.

आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

आदेश.क्र.आसेआ/कक्ष-१/टे-५/परिवि आदेश-२०२६/डॉ.चव्हाण/७३८-३८/२६

आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, मुंबई -०१

दिनांक - १५ एप्रिल, २०२६.

वाचा -

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. परिवि-२७१५/प्र.क्र.३०२/आठ, दि.२९/०२/२०१६.
२) शासन शुध्दिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क. परिवि-२०१८/प्र.क.२/आठ, दि०७/०२/२०१८.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. परिवी-२७१५/प्र.क्र.२०३/आठ, दि. २५/०८/२०१५.
४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. नामनि-१४२३/प्र.क्र.४१३/सेवा-२,दि.२८/०४/२०२३.
५) उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांचे पत्र क्र. जा.क्र./आस्था-५/परिविक्षाकास प्रस्ताव/डॉ/३५२९१-९३/२५, दि. ३०/०९/२०२५.
७) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. संकिर्ण २०२६/प्र.क्र.७०/सेवा-१, दि. ०९/०२/२०२६.

आदेश

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीनुसार डॉ. सुशिल सुरेश चव्हाण यांची महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील "वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा क्षय रुग्णालय, बुलढाणा "गट-अ या पदावर दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीकरीता संदर्भीय दि. २८/०४/२०२३ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेत नियुक्ती करण्यात आली आहे.

उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांनी संदर्भीय दि. ३०.०९.२०२५ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील "वैद्यकीय अधिक्षक" वर्ग-१, जिल्हा क्षय रुग्ण्यालय, बुलढाणा या पदावर पदस्थापना दिलेल्या डॉ. सुशिल सुरेश चव्हाण यांनी त्यांचा दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केलेला असल्याने, त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याची बाब आयुक्तालयाच्या विचारधीन होती.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ, गधील जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गातील डॉ. सुशिल सुरेश चव्हाण, वैद्यकीय अधिक्षक, गट-अ यांनी त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने संदर्भीय शासन निर्णय अन्वये विहीत केलेल्या आवश्यक बाबी समाधानकारकरित्या पूर्ण केलेल्या असल्याने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी खालील तकत्यात दर्शविलेल्या स्तंभ क्र.५ मध्ये नमूद दिनांकास (म.न.) समाप्त करण्यात येत आहे.

अ. क्र.	नाव	कार्यालय	"वैद्यकीय अधिक्षक " पदावरील रुजु दिनांक	परिविक्षाधिन कालावधी समाप्त केलेचा दिनांक	परिविक्षा धिन कालावधी पुढे ढकलण्या ची कारणे	"वैद्यकीय अधिक्षक" पदावरील सेवा नियमितपणे पुढे चालु ठेवण्याचा दिनांक
१	२	३	४	५	६	७
१	डॉ. सुशिल सुरेश चव्हाण	"वैद्यकीय अधिक्षक "वर्ग-१, क्षय आरोग्य धाम, बुलढाणा	दि.०२.०५.२०२३ (म.पू.)	दि.०१.०५.२०२५ (म.नं.)	निरंक	दि. ०२.०५.२०२५

उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांना कळविण्यात येते की, डॉ. सुशिल सुरेश चव्हाण, वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा क्षय आरोग्य धाम, बुलढाणा गट-अ यांच्या पुढील वेतनवाढी नियमानुसार व विहित तरतुदीनुसार मुक्त करण्याच्या अनुषंगाने तात्काळ उचित कार्यवाही करावी.

सामान्य प्रशासन विभाग दि. २२.०६.२०२१ मधील विहीत अटी व शर्तीची पूर्तता करणा-या महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनस्तर एस-२० व त्यावरील) तसेच सामान्य राज्य सेवा गट-अ (वेतनस्तर एस-२० व त्यावरील) मधील अधिका-यांचे परिविक्षा कालावधी समाप्तीचे आदेश निर्गमीत करण्याचे अधिकार शासनपत्र क्र.संकिर्ण-२०२६/प्र.क्र.७०/सेवा-१, दि.०९/०२/२०२६ अन्वये आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांना प्रत्यावर्तीत करण्यात आले आहेत. त्यानुसार सदर आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

हे आदेश आयुक्तालयाच्या https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलबध करण्यात आले आहेत.

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

(राजेंद्र भालेराव)
सहसंचालक, (प्रशासन)
आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

प्रत - उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला.
प्रत - जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बुलढाणा.
प्रत - मा.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) -२, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
प्रत - मा.महालेखापाल, लेखापरीक्षा-१, महाराष्ट्र , मुंबई/ नागपूर
प्रत - जिल्हा कोषागार अधिकारी ,बुलढाणा.
प्रत - डॉ. सुशिल सुरेश चव्हाण,वैद्यकीय अधिक्षक, क्षय आरोग्य धाम बुलढाणा.
प्रत- आयटी सेल, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई- आपणांस कळविण्यात येते की उपरोक्त आदेश https://nhm.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
प्रत - निवडनस्ती (कार्यासन-१)